**सुविचार**

जिस देश में हर व्यक्ति स्वयं को अपने पडोसी से श्रेष्ठ समझता हो, तो क्या ऐसे देश में एकता हो सकती है ?

(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेव वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर
जि. लातूर
प्रवेश सूरू
2023-24
11 th, 12 th & Repeaters
NEET / IIT- JEE
संपर्क : 9423351370, 9890103190
अध्यक्ष : मल्लिकार्जूनअप्पा गदगेअप्पा मानकरी
सचिव : रामचंद्र पंढरीनाथ तिरूके

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/बुधवार दि. २१ फेब्रुवारी २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१०२✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## बारावीच्या परीक्षेला सुरूवात

पुणे : प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात येणारी बारावीची लेखी परीक्षा बुधवारपासून (दि. २१) सुरू होत आहे. या परीक्षेसाठी राज्यातील एकूण १५ लाख १३ हजार ९०९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.


नियमित, खासगीरीत्या परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांसह श्रेणीसुधार योजनेअंतर्गत आयटीआय आणि पुनर्परीक्षार्थी अशा एकूण बारावीच्या परीक्षेसाठी नोंदणी करणा-या सर्वच विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. त्यामुळे यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत विद्यार्थी संख्या ५६ हजार ६१६ ने वाढली आहे.राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या ९ विभागीय मंडळांमार्फत २१ फेब्रुवारी ते १९ मार्च या कालावधीत बारावीची परीक्षा आयोजित केली आहे. राज्यातील १० हजार ४९६ कनिष्ठ महाविद्यालयांमधून या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली आहे. राज्यात ३ हजार ३२० मुख्य केंद्रांवर परीक्षा आयोजित केली आहे, अशी माहिती राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक उपस्थित होत्या. या परीक्षेसाठी ८ लाख २१ हजार ४५० विद्यार्थ्यांनी आणि ६ लाख ९२ हजार ४२४ विद्यार्थीनींनी नोंदणी केली आहे. एकूण **(पान ७ वर)**

# मराठा आरक्षण एकमताने मंजूर

मुंबई : राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण विधेयक आज विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले. मराठा समाजासाठी दहा टक्के आरक्षणासाठी घेतलेला हा निर्णय ऐतिहासिक, धाडसी आणि कायद्याच्या कसोटीवर टिकणारा असल्याचे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे विधेयक विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने संमत केल्याबद्दल सर्व सदस्यांचे आभार मानले.

ओबीसी अथवा इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला असून



मराठा समाजाला आरक्षण देण्याची शपथ घेतल्यानंतर शासनाने तीन महिन्यात आरक्षणाचा निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. मराठा समाज बांधवांनी केलेल्या आंदोलनाबाबत उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले, लाखो मराठा बांधवांनी आपल्या हक्कांसाठी लढा देताना आजवर संयम सोडलेला नाही. शिस्त मोडली नाही. याबद्दल मी संपूर्ण मराठा समाजाचे, तरुण-तरुणींचे आभार व्यक्त करतो. आजचा निर्णय हा मराठा समाजाचा, मराठा ऐक्याचा विजय आहे आणि हा चिकाटीने दिलेल्या लढ्याचा विजय आहे. मी एका सर्वसामान्य मराठा शेतकऱ्याचा मुलगा आहे. समाजाच्या वेदना, दु:खाची मला जाणीव आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर हे दु:ख, वेदना कमी करण्यासाठी अनेक आघाड्यांवर सकारात्मक प्रयत्न केले, करत असल्याचे त्यांनी सांगितले. समाजबांधवांनी शासनावर विश्र्वास ठेवावा, कुठलाही दूजाभाव ठेवला जाणार नाही, असे सांगून आंदोलनकर्त्यांनी आंदोलन मागे घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, एकेकाळी प्रगत असलेला मराठा समाज आता काळाच्या **(पान ७ वर)**

# भारत-रशियाचे मैत्रीपूर्ण संबंध

म्युनिक : भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर सध्या म्युनिक सुरक्षा परिषदेसाठी जर्मनीत आहेत. यावेळी त्यांनी जर्मनीतील आघाडीचे वृत्तपत्र हँडल्सब्लाटला मुलाखत दिली, ज्यात भारत आणि रशियाचे संबंध, रशियाकडून तेल खरेदी करणे आणि पाश्र्चिमात्य देशांकडून पाकिस्तानला होणा-या शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्यावर भाष्य केले आहे.



परराष्ट्र मंत्री एस जयशंकर म्हणाले की, भारत आणि रशियामध्ये स्थिर आणि मैत्रीपूर्ण संबंध आहेत आणि रशियाने कधीही भारताच्या हिताला धक्का लावला नाही. कोणताही देश दुसऱ्या देशासोबत भूतकाळातील संबंधांच्या आधारावरच संबंध ठेवतो. रशियासोबतचे आमचे संबंध भूतकाळातील अनुभवांवर आधारित आहेत. रशियाने कधीही आपल्या हितसंबंधांना धक्का लावला नाही. आमचे संबंध नेहमीच स्थिर आणि मैत्रीपूर्ण राहिले आहेत.

रशियाकडून स्वस्त तेल खरेदी

रशियाकडून सुरू असलेल्या तेल खरेदीवरुन अमेरिकेसह अनेक पाश्र्चात्य देशांनी भारतावर टीका केली, त्यालाही जयशंकर यांनी चोख प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले की, भारताकडे रशियाकडून तेल खरेदी करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. रशियन तेलावर बंदी घातली, तेव्हा श्रीमंत पाश्र्चिमात्य देशांनी वाढीव किमतीवर मध्यपूर्वेतील देशांकडून तेल खरेदी केले, पण भारत तसे करू शकत नाही.

रशियाकडून स्वस्त दरात तेल

भारताला रशियाकडून स्वस्त दरात तेल मिळाले आणि आम्ही ते विकत घेतले. मध्यपूर्व पुरवठादारांनी युरोपीय देशांना प्राधान्य दिले, कारण ते तेलासाठी जास्तकिंमत द्यायचे. सर्व देशांनी मध्यपूर्वेतील **(पान ७ वर)**

# जपानने तयार केला जगातील पहिला लाकडी उपग्रह

टोकियो : जपान आणि अमेरिका मिळून सध्या एका महत्त्वाकांक्षी अवकाश मोहिमेवर काम करत आहेत. जगातील पहिला लाकडी उपग्रह अवकाशात प्रक्षेपित करण्यासाठी हे देश सज्ज झाले आहेत. लिग्नोसॅट असे या उपग्रहाचे नाव आहे. यंदाच्या उन्हाळ्यात हा उपग्रह लाँच करण्यात येईल.

हे प्रक्षेपण एक प्रयोग म्हणून केले जाणार आहे. सध्या अंतराळात हजारो निकामी उपग्रह आहेत. यामुळे पृथ्वीभोवतीचा स्पेस-कचरा ही एक मोठी समस्या बनली आहे. यातील कित्येक उपग्रह पृथ्वीवर कोसळण्याचाही धोका असतो. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून लाकडी उपग्रहांचा वापर करण्याची संकल्पना मांडण्यात आली होती. या उपग्रहाची निर्मिती जपानच्या क्योटो विद्यापीठातील संशोधकांनी केली आहे. यासाठी सुमिमोटो



फॉरेस्टरी कंपनीने देखील सहकार्य केले आहे. तर याला अवकाशात प्रक्षेपित करण्यासाठी अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था असलेल्या नासाच्या रॉकेटचा वापर करण्यात येणार आहे. दि गार्डियनने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केले आहे.

कोणत्या लाकडाचा वापर?

अंतराळातील दबाव, प्रवास सगळ्या गोष्टींना सहन करण्याची क्षमता उपग्रहांमध्ये असते. यासाठी मुख्यत्वे ते मेटलचा वापर करून तयार केले जातात. यामुळे लाकडापासून उपग्रह बनवताना सगळ्यात मोठे चॅलेंज हे मजबूत लाकूड शोधणे होते. यामुळे मग मॅग्नोलिया लाकडाचा वापर करण्याचा निर्णय घेतला.

प्रदूषणाला बसणार आळा

पृथ्वीच्या वातावरणात जे उपग्रह पुन्हा प्रवेश करतात, ते खाली कोसळत असताना हवेशी घर्षण होऊन जळून जातात. यावेळी त्यातून लहान-लहान ॲलुमिना कण हवेत पसरतात. हे कण पृथ्वीच्या वातावरणात कित्येक वर्षं टिकून राहतात, ज्यामुळे प्रदूषणाचा धोका आहे. लाकडी उपग्रहामुळे हा धोकाही कमी होणार आहे. लाकडाचा उपग्रह असल्यामुळे पृथ्वीवर कोसळत असताना तो पूर्णपणे जळून जाणार आहे. लाकूड हे बायोडिग्रेडेबल असल्यामुळे याचा पर्यावरणाला धोका नसल्याचं क्योटो विद्यापीठाच्या संशोधकांनी स्पष्ट केले.

# चव्हाण, कुलकर्णी, देवरांसह सहा जण राज्यसभेवर बिनविरोध



मुंबई : राज्यसभेच्या महाराष्ट्रातील सहा जागांसाठी सहाच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याने निवडणूक बिनविरोध होणार हे आधीच स्पष्ट झाले होते. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर आज त्यांच्या निवडीची औपचारिक घोषणा करून त्यांना विजयाचे प्रमाणपत्र देण्यात आले.

राज्यसभेच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांनी अर्ज भरले. सातव्या अपक्ष उमेदवाराच्या अर्जावर सूचक, अनुमोदकांच्या सह्या नसल्याने तो अर्ज छाननीतच बाद झाला होता. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाल्याचे आधीच स्पष्ट झाले होते. आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची मुदत होती. ती संपल्यानंतर माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी डॉ. अजित गोपछडे(भाजप) माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे (काँग्रेस) माजी केंद्रीय मंत्री मिलिंद देवरा ( शिवसेना-शिंदे) व प्रफुल्ल पटेल (राष्ट्रवादी- अजित पवार) यांची निवड झाल्याचे घोषित करून, त्यांना विजयाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.



जळकोट येथील नविन बांधलेल्या वास्तूस राज्याचे क्रिडा युवक कल्याण व बंदरे मंत्री ना. संजय बनसोडे यांनी दि. १९ रोजी दैनिक यशवंतचे प्रतिनिधी श्री. माधव होनराव यांच्या नवी निमिर्ती निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

# श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाची सांगता

## दोन लाख भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

लातूर; ( प्रतिनिधी)- श्री श्री राधाकृष्ण सत्संग समितीच्या वतीने लातूर नगरीत आयोजित सात दिवसीय श्री श्री अष्टोत्तर शत कुंडात्मक अतिरुद्र महायागाची सांगता परमपूजनीय विद्यानंदजी सागर बाबा आणि भारतभरातून आलेल्या साधुसंतांच्या हस्ते यज्ञात आहुती टाकून करण्यात आली .यावेळी ब्रह्मवृंदांनी वेदमंत्रांचा जयघोष केला .तसेच पूजनीय बाबांच्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचीही आज सांगता झाली .

लातूर नगरीतील श्री राजीव गांधी चौक पंचमुखी हनुमान परिसरात १५ एकर जागेत सात मजली यज्ञशाळा आणि विशाल कथामंडप उभारण्यात आला होता. या यज्ञशाळेत लातूर शहर व परिसरातील दररोज १०८ दांपत्यांनी होम -हवन करीत महायागात सहभाग नोंदवला .यज्ञ आचार्य वेदशास्त्रसंपन्न सुयश शिवपुरी (पैठण ) यांच्या पौरोहित्याखाली जवळपास १०८ ब्रह्मवृंदांनी यज्ञ कर्म केले .मंगळवारी परम पूजनीय विद्यानंदजी सागर बाबा आणि साधुसंत तसेच संयोजन समितीचे पदाधिकारी आणि १०८ यजमानांच्या पूर्णाहुतीने यज्ञाची सांगता झाली. यावेळी बाबांजी सह साधुसंत ,यजमानानी यज्ञशाळेस सात प्रदक्षिणा घातल्या. अत्यंत मांगल्यपूर्ण, शुद्ध ,सात्विक व पवित्र वातावरणात यज्ञाची पूर्णाहुती झाली. उपस्थित ब्रह्मवृंदांसह शेकडो भाविकांनी 'यज्ञ नारायण भगवान की जय ','सनातन हिंदू धर्म की जय 'आदींचा जयघोष केला

या यज्ञकर्मात स्वामी राघवानंदजी गिरीजी (राजस्थान), स्वामी बालकानंदजी गिरीजी (आंध्र प्रदेश ),स्वामी ब्रह्मानंद गिरीजी, स्वामी राजेश्र्वरानंद गिरीजी (झाशी ),स्वामी सुरेशानंद गिरीजी (ऋषिकेश ),स्वामी गोविंदानंद गिरीजी ,स्वामी सुरेशानंद गिरीजी (ऋषिकेश ),स्वामी नंदगिरी ,स्वामी शिवानंद गिरीजी (हरिद्वार ),स्वामी नित्यानंदजी गिरीजी (शिर्डी ),स्वामी हरिनारायण गिरीजी( हिमाचल प्रदेश ),स्वामी गोरक्षानंद गिरीजी( मुंबई ),स्वामी पूर्णानंद गिरीजी( मध्य प्रदेश ),स्वामी कैवल्य गिरीजी (हरिद्वार), स्वामी शंकरानंद गिरीजी (काशी ),स्वामी सुरत गिरी (अकोला )साध्वी सोनाली गिरीजी (अकोला) , स्वामी नित्यानंद सरस्वती (हरिद्वार



) ,स्वामी गणेशानंद गिरीजी (संभाजीनगर ),स्वामी गणेश्र्वरानंद गिरीजी तसेच संयोजन समितीचे अध्यक्ष हरिप्रसाद मंत्री, सचिव संजय बोरा, नाथसिंह देशमुख ,राजेश्र्वर बुके ,विशाल जाधव, सिद्धराम जाधव ,दगडे पाटील ,जगदीश तापडिया ,ब्रह्मानंद लोमटे उमेश गारठे ,मनीष आकनगिरे आदींनी सपत्निकआजच्या यज्ञकर्मात सहभाग नोंदवला.

कथेच्या समाप्तीच्या वेळी पंचमुखी हनुमान मंदिर देवस्थान समिती, **(पान ७ वर)**

# छोट्या साहित्यसंमेलनातून प्रकट होणारा अविष्कार हे उद्याचे संचित- धनंजय गुडसूरकर

## रांजणगावात १५ वे राज्यस्तरीय शिक्षक साहित्य संमेलनाचे उद्घाटन



पुणे /प्रतिनिधी- मराठी साहित्य विश्वात होणारी विविध साहित्य संमेलने ही भाषिक प्रेमाचा अविष्कार आहेत, यातून पुढे येणारे साहित्य व साहित्यिक हे आगामी काळाचे संचित असणार आहे असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक , वक्ते व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर यांनी केले . शिक्षक हा साहित्याचा सर्वात मोठा वाहक असून शिक्षकांच्या प्रतिभेचा हा सोहळा साहित्य व शिक्षणासाठी पोषक असल्याचे गुडसूरकर म्हणाले . महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या विद्यमान आयोजित १५ व्या राज्यस्तरीय शिक्षक साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी गुडसूरकर बोलत होते .

एकात्मता, सुसंस्कृतपणा ही आपली ओळख आहे, एकात्म भारताचे प्रतिबिंब साहित्यातून उमटायला हवे अशी अपेक्षा डॉ श्रीपाल सबनीस यांनी यावेळी अध्यक्षपदावरून बोलताना व्यक्त केली . रांजणगाव येथील महागणपती देवस्थानच्या परिसरात जेष्ठ विचारवंत प्रा . डॉ . श्रीपाल सबनीस यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन संपन्न झाले . या संमेलनाचे उद्घाटन महागणपती देवस्थानच्या अध्यक्षा सौ . स्वाती पाचुंदकर यांच्या हस्ते झाले . प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर, साहित्यिक राजन लाखे उपस्थित होते . यावेळी मंचावर काव्यप्रेमी शिक्षक मंचचे संस्थापक अध्यक्ष आनंद घोडके, सचिव कालिदास चवडेकर, उपाध्यक्ष पी.नंदकिशोर, कोषाध्यक्ष कृष्णा शिंदे , सहसचिव दीपक सपकाळ, सदस्य सौ.जया नेरे, प्रमोद बाविस्कर, सौ.वर्षा भांदर्गे, नवनाथ खरात, रामदास देशमुख डॉ.शिवाजी शिंदे, राजेंद्र भोसले, रामचंद्र नवले इत्यादी मान्यवर **(पान ७ वर)**

# सायकल वाटपातला लातूर पॅटर्न साकारु - जिल्हाधिकारी



लतूर / प्रतिनिधी- घरापासून कोसो दूर असलेली शाळा वेळेत गाठता यावी, हा प्रवास सुकर व्हावा यासाठी कष्टकरी परिवारांच्या ५१ विद्यार्थीनींना येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. हर्षवर्धन राऊत व त्यांच्या पत्नी डॉ. शुभांगी राऊत यांच्या वतीने सोमवारी (दि.१९) शिवजयंती दिनी मोफत सायकली देण्यात आल्या. राऊत परिवाराची ही बांधिलकी खरा शिवधर्म उजळ करणारी अन प्रेरणा देणारी असून सायकल वाटपाचा लातूर पॅटर्न साकारण्यासाठी आता प्रशासनही पुढाकार घेईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी केले.

चंद्रनगरमधील अंबामाता मंदीरा शेजारी असलेल्या गुजराती स्कुलच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला. निवेदिका क्षिप्रा मानकर, डॉ. कल्पना किनीकर, डॉ. माधुरी कदम, डॉ. शुभांगी राऊत, डॉ. विमल डोळे, डॉ. शारदा इरपतगिरे, डॉ. मंजुषा कुलकर्णी, डॉ. पल्लवी जाधव, डॉ. स्मिता वडे, डॉ. अरुणा कवळास, डॉ. शीला पवार, गंधाली वारद, पुनम पाटील ,वर्षा राऊत पाटील, डॉ. श्वेता पवार, आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे म्हणाल्या माझाही शालेय प्रवास सायकलवरुन सुरू झाला तिच्या फिरत्या चाकाप्रमाणे मी अभ्यासतही गती कायम ठेवली अन आज लाल दिव्याची गाडी मला मिळाली. तुम्हीही असे सातत्य ठेवा अन खुप मोठ्या यशाचे शिलेदार व्हा, असे त्या म्हणाल्या. यासाठी छत्रपती शिवरायांच्या कार्याची महतीही त्यांनी सांगितली. निवेदिका तथा व्याख्याता क्षिप्रा मानकर यांनी आपल्याला मदत करणारे दाते अन् त्यांच्यातील दातृत्व आपल्या अंगी रुजावे इतका आपल्या कर्तृत्वाचा आलेख उंच करावा.आपण मोठे होत असताना लोक काय म्हणतील याकडे लक्ष न देता.स्वतःवर विश्वास ठेवावा.आज सायकल मदत म्हणून मिळत आहे परंतू पायलट होवून विमानात बसून यशाच्या उंच गगनात झेपावण्याचे लक्ष्य ठेवावे असे सांगितले. प्रास्ताविकात डॉ. शुभांगी राऊत यांनी सायकल वाटपामागची भुमिका व राज प्रतिष्ठानच्या विविध सामाजिक उपक्रमाबद्दल माहिती सांगितली. सुत्रसंचलन डॉ.श्वेता पवार यांनी केले. आभार डॉ. हषवर्धन राऊत यांनी मानले.

सायकल वाटपाचा लातूर पॅटर्न साकारण्याची **(पान ७ वर)**

दैनिक
यशवंत
अहमदपूर/चाकूर परिसर
बुधवार दि.२१ फेब्रुवारी २०२४ २
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

# आज शिरुर ताजबंद येथे मोफत नेत्र तपासणी व अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

अहमदपूर दि. २०(कारामुंगीकर): येथुन जवळच असलेल्या शिरुर ताजबंद येथे आज दि. २१ फेब्रुवारी २०२४ रोजी मोफत नेत्र तपासणी व अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मातोश्री ऑप्टिकल (डोळ्याचा दवखाना) व उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालय उदगीर यांच्या संयुक्त विद्यमानाने मौजे शिरूर ताजबंद येथे आज दि.२१/०२/२४ वेळ सकाळी १०.०० ते ३.०० या दरम्यान मोफत नेत्र तपासणी व अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी उदयगिरी लायन्स नेत्ररुग्णालय, उदगीर येथील अध्यक्ष डॉ. आर. एन. लखोटीया यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तर यावेळी उदयगीरी लॉयन्स नेत्र रुग्णालय, उदगीर येथील डॉ. सुधाम बिरादार, डॉ. मोतीराम चिखले हे उपस्थित राहणार आहेत.

तरी शिरूर ताजबंद परिसरातील जनतेनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन मातोश्री ऑप्टिकलचे प्रो. प्रा. बळीराम पिचारे व यांच्या सहकाऱ्यांच्या वतिने करण्यात आले आहे.

# बारावी बोर्ड परीक्षा सुरळीत होण्यासाठी अहमदपूर तालुक्यात यंत्रणा सज्ज– गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे

अहमदपूर दि.२०(कारामुंगीकर) बारावी बोर्ड परीक्षा सुरळीत होण्यासाठी अहमदपूर तालुक्यात यंत्रणा सज्ज असल्याचे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांनी केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षा आज दि.२१ फेब्रुवारी पासून सुरूवात होत आहे. अहमदपूर परिसरात माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१२ बोर्ड परीक्षा )केंद्रावर सुरळीत होण्यासाठी यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. एच.एस.सी.बोर्ड परीक्षा सुराळीत पार पडण्यासाठी केंद्रप्रमुखांना योग्य ती सूचना बैठकीत देण्यात आली.परिरक्षक कार्यालय,गट साधन केंद्र अंतर्गत तालुक्यातील परीक्षा केंद्रावर




परिरक्षक कार्यालयांतर्गत ३५९१ विद्यार्थी बारावीची परीक्षा देत आहे.

सदरील परीक्षा महात्मा गांधी कॉलेज ४१० विद्यार्थी, महात्मा फुले ज्यू.कॉलेज ३९५ विद्यार्थी, यशवंत ज्यू कॉलेज २६४विद्यार्थी,कस्तुरबा गांधी ज्यु.कॉलेज १९० विद्यार्थी,पोस्ट बेसिक आश्रम शाळा ढाळेगाव २८२विद्यार्थी, गोरटे आश्रम शाळा तुळशीराम तांडा ३७० विद्यार्थी वरील केद्रावर परीक्षा देतील. या ६ मुख्य केंद्रावर १९११ विद्यार्थी परीक्षार्थी आहेत. परिरक्षक क्र. (२३८) अहमदपूर येथिल मुख्य परिरक्षक गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, उप.परिरक्षक रमाकांत बिलापट्टे , सह सहाय्यक परिरक्षक (रनर) म्हणून रमेश चेपुर, सुधीर भोसले, शिवाजी घटकार, केंद्रे विवेक, मुंडे कृष्णा, गुंजोटे सर, किनकर सोमनाथ, मंगेश कासले, प्रा.शेळके.UID लावणार सय्यद इकबाल अहेमद, सेवक एम.एम.पठाण सह परीक्षा सुरळीत होण्यासाठी योग्य पद्धतीने नियोजन केले आहे.

यावेळी उपप्राचार्य सय्यद एम. यू., प्रा. कल्लुरकर, युवराज पाटील आदींची उपस्थिती होती.

यावेळी प्रत्यक्ष परीक्षा सुरु असताना संबंधित परीक्षा केंद्रावर काही गैर प्रकार घडत असल्यास बैठे पथक, सहायक परिरक्षक (रनर) यांनी इमारतीच्या परीसराचे व परीक्षा दालनाच्या बाहेरील परीसरांचे आवश्यकतेनुसार व्हिडीओ चित्रिकरण करण्यासाठीचे सक्त सूचना दिले गेले आहेत. बाहेरच्या परीसरातून परीक्षा केंद्रावर काही गैरप्रकार घडत असेल तर तात्काळ कार्यवाहीसाठी क्षेत्रीय अधिकारी, विभागीय सचिवांना अवगत करण्यात येणार आहे.

परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी भरारी पथक आणि महिलांचे विशेष पथक परीक्षा केंद्रावर तैनात केले आहे.

# किशोरवयीन मुलींनी जीवनशैली बदलावी –डॉ. स्वाती जोशी यांचे प्रतिपादन




अहमदपूर दि. २० (कारामुंगीकर): किशोरवयीन मुलींनी जीवनशैली बदलावी असे प्रतिपादन डॉ. स्वाती जोशी यांनी केले.

त्या मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळाया उपक्रमांतर्गत किशोरवयीन मुलींच्या समुपदेशन सत्राचे आयोजन डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयांमध्ये करण्यात आले त्यावेळी त्या बोलत होत्या.

पुढे बोलताना डॉ. जोशी म्हणाल्या की, सध्या बदलती जीवनशैली खाण्याच्या चुकीच्या सवयी ताणतणाव यामुळे पहिली पाळी येण्याचे अर्थात ऋणप्राप्तीचे वय खालावले आहे. त्यामुळे किशोरवयीन मुलींनी माहिती घेऊन आपल्या जीवनशैलीमध्ये बदल करून काळजी घ्यावी असेही त्या शेवटी म्हणाल्या.

यावेळी मुलींनी परखडपणे आपले मत व्यक्त केल्या. तसेच अनेक विद्यार्थिनींनी स्टेजवर येऊन मनमोकळेपणे आपल्या मनातील प्रश्न शंका ना केवळ व्यक्त केल्या तर मासिक पाळी विषयाच्या विटाळ चुकीच्या रुढी गैरसमज विषय परखडपणे भाष्य केले. त्याचप्रमाणे विज्ञानवादी विचार व्यक्त केले. डॉ. जोशी मॅडमने त्यांच्या प्रश्नांचे विज्ञानाच्या दृष्टिकोनातून शास्त्रोक्त उत्तराने समाधान केले. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती रजनी मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैशाली नागरगोजे मॅडम, अंजली पांचाळ मॅडम, अंजली परतवाघ मॅडम, कल्पना कराड मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांबटसांगवी तंबाखू मुक्त शाळा म्हणून घोषित

अहमदपूर दि. २०(कारामुंगीकर): जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांबटसांगवी तंबाखू मुक्त शाळा म्हणून घोषित करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांबटसांगवी या शाळेने ठरवून दिलेले नऊ निकष पूर्ण करून माहिती ऑन लाईन भरली होती.या शाळे-




ने निकषांची पूर्तता केल्यामुळे सलाम बॉम्बे या संस्थेकडून ही शाळा तंबाखुमुक्त शाळा म्हणून काल घोषित करण्यात आल्याचे प्रमाणपत्र नुकतेच शाळेला प्राप्त झाले आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांबटसांगवी ही शाळा तांबाखूमुक्त शाळा म्हणुन घोषित झाल्यामुळे अहमदपूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी ढोकाडे साहेब, केंद्रप्रमुख कोनाले सर, केंद्रीय मुख्याध्यापक गुरमे सर शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, ग्रामास्थनी यांनी अभिनंदन केले आहे.

# ग्रामपंचायत टेंभुर्णी येथील पिण्याच्या पाण्यासाठी चे आंदोलन व उपोषण आश्वासनामुळे सोडले

अहमदपूर दि. २०(कारामुंगीकर): ग्रामपंचायत टेंभुर्णी येथील पिण्याच्या पाण्यासाठी चे आंदोलन व उपोषण आश्वासनामुळे सोडण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, ग्रामपंचायत टेंभुर्णी येथील शिवसेना बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कार्यालय प्रमुख सुभाष गुंडीले, व समस्त गावकरी मंडळी ग्रामपंचायत टेंभुर्णी येथे पिण्याच्या पाण्यासंदर्भात धरणे आंदोलन पंचायत समिती कार्यालय अहमदपूर येथे उपोषण चालू असताना, तहसीलदार शिवाजी पालेपाड , गट विकास अधिकारी अंदलवाड व शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांनी मध्यस्थी करून तहसीलदार, गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत टेंभुर्णी येथे मुख्याधिकारी यांना लेखी स्वरूपात पत्र काढून अहमदपूर येथील सार्वजनिक पाण्याचे टाकी येथून ग्रामपंचायत टेंभुर्णी यांना ३६००० लिटर पाणी चार दिवसांमध्ये सप्लाय करण्याचे लेखी पत्रक दिली आहेत. त्यामुळे पंचायत समिती कार्यालय अहमदपूर येथे बसलेले धरणे आंदोलन व उपोषण चार दिवसांमध्ये टँकरची सोय होणार आहे म्हणून सोडण्यात आले आहे.

चार दिवसात तर टँकरची सोय नाही झाली तर लोकशाही मार्गाने रस्ता रोको करून आंदोलन करण्यात येणार आहे.

त्यावेळी उपस्थित अंगद सोळंके, रंगनाथ सोळंके, काशिनाथ सोळंके, माधव शिंदे, दत्तात्रेय सोळंके, यशवंतराव देशमुख, ग्रामसेवक फुलमटे, मेहबूब पठाण, लक्ष्मण जाधव, बालाजी कासले, केशव सोळंके, बजरंग गायकवाड, मारुती बिलापट्टे, इस्माईल पठाण, महादेव चलवदे , उप तालुकाप्रमुख तिरुपती पाटील, शिवसेना उप शहर प्रमुख शिवकुमार बेंद्रे, अजय सुरनर, ओम गुंडरे, राहुल गिरी, बाळूचव्हाण, समस्त गावकरी उपस्थित होते.

# समाज प्रबोधनी पुरस्कारासाठी आवाहन

अहमदपूर दि. २०(कारामुंगीकर): समाज प्रबोधनी पुरस्कारासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतिने आवाहन करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर येथील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून शहीद डॉ नरेंद्र दाभोळकर यांनी समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी आपले आयुष्य खर्च केले .अनिष्ट रुढी परंपरेला छेद देत समाजातील व महिलांमधील अंधश्रद्धा दूर झाल्या पाहिजे. हा हेतू घेऊन . ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रांमध्ये पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून एक पाऊल पुरुषांच्या पुढे काम करणाऱ्या अशा अनेक महिला समाजामध्ये वावरत असतात .त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांचाही कुठेतरी सन्मान झाला पाहिजे .

या पुरस्कारामुळे मुळे इतरांनाही समाजामध्ये कामकरण्यासाठी नक्कीच प्रेरणा मिळत असते म्हणून आपण सामाजिक बांधिलकी म्हणून काम करत असाल तर आपण सन्मानास पात्र नक्कीच असाल आपल्या कामाची दखल घेऊ प्रतिवर्षाप्रमाणे विविध क्षेत्रातील उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांचा.गेल्या १५ वर्षापासून प्रबोधनपर व्याख्यान. समाज प्रबोधनी पुरस्कार व सन्मानपत्र .ट्राफि देऊन अनेक मान्यवरांच्या हस्ते. वितरण केले जाते. आपण केलेल्या सामाजिक कार्याची अधिक माहिती दिनांक १. ३ .२०२४ पर्यंत मेलवर meghraj2021@gmail.com किंवा पोस्टाने खालील पत्त्यावर पाठवावे.

विज्ञान निर्भयता नीती

अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शाखा अहमदपूर.
अध्यक्ष : डॉ.धिरज देशमुख. ९४२२४६८९१०, मार्गदर्शक : गोविंद शेळके .९४०४६८१७६६, सचिव : मेघराज गायकवाड ९४२२९४१५३३, कार्यअध्यक्ष : प्रा. रत्नाकर नळेगावकर ९७६५३४१२३४, उद्धव ईपर : ७७९८९९८८२३, राम तत्तापुरे सर ९७६४३३०३००, अजहर बागवान ८४२१६६६२५२, चंद्रशेखर भालेराव : ९५११११६९०, इमरोज पटवेकर ८०८०२११४११, डॉ भाग्यश्री येलमटे : ९४२२०१३१५६, डॉ. ललिता किनगावकर : ९२०९१६१७००, सुरेखा उपरवाड : ९९२२४८१६१५, आशा रोडगे ९७६५५८८२३७, ॲड. एस एम नळेगावकर ८१७७८५५०५१, अंजली बाघबर ९९२२३२०८५५ वरील मोबाईलवर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ

**(मल्टिस्टेट को–ऑप, सोसायटीज ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन ॲण्ड फन्सिलेशन ॲक्ट अन्वये)**

जा.४५८८ क्र. दि. १८/०१/२०२४

**रेणूका भवन,**
**रेणूका भवन, २ मजला, सर्वे नं. ३५/२अ–२ब, पुष्पक हॉटेल जवळ,**
**पाईप लाईन रोड सावेडी अ. नगर.**
**अहमदनगर – ४१४००१**

### जाहीर नोटीस

श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को–ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहमदनगर - अर्जदार
विरुद्ध

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|
| १७५७/२०२३ | | कर्जदार श्री/श्रीमती सुचिता संतोष कोटलवार<br>रा. साई निवास थोडगा, अहमदपूर. ता. अहमदपूर जि. लातूर<br>जामीनदार श्री/श्रीमती - कोमल केशव गोटेमवाड<br>रा. पाचोमा नगर, अहमदपूर ता. अहमदपूर जि.लातूर<br>जामीनदार श्री/श्रीमती - श्रीनिवास नंदकुमार कोटलवार<br>रा. बनवस, ता. पालम, जि. परभणी |

सदर नोटीसव्दारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दि. २७/०१/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजन न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/ एकतर्फी हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस माझ्या सही व शिक्यानीशी दिले असे.

शिक्का

सही/-
**ॲड. तनपुरे गोविंद दशरथ**
**लवाद अधिकारी**

## टी.सी. हरवली आहे

**संदीप भिवाजी रुपनर** रा.वझर ता देगलुर जि नांदेड यांची ६ वी पास प्रियदर्शनी विद्यालय, अहमदपूर ची टी.सी. दि १५.०२.२४ रोजी वार गुरूवार वेळ दुपारी १:०० वाजता अंदाजे अहमदपूर बस स्टँड येथे हरवली आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.मो.नं.७३४९७४२३१७

# श्री सेवा जनरल हॉस्पिटल अंधोरी च्या वतीने मोफत स्त्रीरोग निदान शिबिर संपन्न

अहमदपूर दि. २०(कारामुंगीकर): श्री सेवा जनरल हॉस्पिटल अंधोरी च्या वतीने मोफत स्त्रीरोग निदान शिबिर घेण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, श्री सेवा जनरल हॉस्पिटल आणि आशा हॉस्पिटल लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत स्त्रीरोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वंभर स्वामी तर उद्धाटक सरपंच सौ.प्रफुल्लाताई ब्रिंगणे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ रवींद्र सुरवसे साहेब होते. यावेळी ग्रा. प. सदस्य बापूराव देऊळकर, विठ्ठल मंगे, डॉ देवकत्ते, शिवव्याख्याते बळुभाऊ केंद्रे,हर्सद कांबळे, गणेश देवकाते, बळीराम लोहारे या सर्वांचे स्वागत आयोजक डॉ विजयकुमार राठोड यांच्यावतीने




करण्यात आले.

यावेळी डॉ रवींद्र सुरवसे यांनी स्त्रिरोगविषयी सखोल मारगदर्शन केले. तसेच अंधोरीच्या सरपंच यांनी पण स्त्रियांनी तपासणी करून घ्यावी असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बलुभाऊ केंद्रे यांनी केले.या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले ते श्री सेवा जनरल हॉस्पिटल अंधोरी,तसेच नारायणा निसर्गोपचार महाविद्यालयाचे संचालक डॉ विजयकुमार राठोड, डॉ नागनाथ देवकत्ते, हरसद कांबळे, बापूराव देऊलकर, गणेश देवकत्ते, ओम फुलारी, बळीराम लोहारे तसेच आशा हॉस्पिटल लातूर येथील सर्व स्टाफ उपस्थित होता.

या स्त्रिरोग शिबिरात एकूण १७० रूग्णांची तपासणी करून औषध गोळ्या मोफत देण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग घेतला. यावेळी परिसरातील महिला उपस्थित होत्या.

# हनुमान मंदिर हडोळती येथे रक्तदान शिबिर संपन्न

हाडोळती दि. २०(नागसेन गायकवाड): हनुमान मंदिर हडोळती येथे रक्तदान शिबिर संपन्न झाले.

याबाबत अधिक माहिती अशी की, अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेने स्व-स्वरूप संप्रदाय तर्फे रक्तदान शिबिर घेण्यात आले.

सविस्तर माहिती अशी की अर्पण ब्लड बँक लातूरचे डायरेक्टर श्याम लकडे तसेच डॉ.कुलदीप पवार,संजीवनी वजीरे,पद्मिनी यादव इत्यादींच्या मार्गदर्शनाखाली एकूण ४८ जणांनी तीनशे ग्रॅमच्या ४८ बॅग दिल्या.




अहमदपूर तालुक्यातील हडोळती येथील सेवा केंद्रात रक्तदान शिबिर संपन्न झाले.

जिल्हा कर्नल-चंद्रकांत कदम,अहमदपूर तालुका सेवा समितीचे तालुकाध्यक्ष श्री श्रीराम मामडकगे,तालुका महिला अध्यक्षा सौ.कमलाताई सूर्यवंशी, तालुका अध्यात्मिक प्रमुख श्री येलवंतगे,तालुका प्रसिद्धी प्रमुख नारायण विठ्ठल राऊतवाड देवणी तालुका प्रमुख संभाजी सोळंके व तसेच तालुका सचिव भास्कर दिंडे, हडोळती सेवा केंद्राध्यक्ष-गजानन नरसिंग चौधरी युवा प्रमुख संग्राम राजे,प्रल्हाद मोरे,संतोष गोजेवाड,धनंजय जांभळीकर,नागेश जांभळीकर,नरसिंग चौधरी,शिवराज निलेवाड इत्यादींनी परिश्रम घेतले.

# आज अहमदपूरात जिजाऊ – सावित्री व्याख्यानमालेचे आयोजन

अहमदपूर दि. २०(कारामुंगीकर): आजासून अहमदपूरात जिजाऊ - सावित्री व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, वीर भगतसिंह विद्यार्थी परिषद, डॉक्टर पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, व सर्व परिवर्तनवादी संघटना अहमदपूर यांच्या संयुक्त विद्यमाने अहमदपूरमध्ये जिजाऊ सावित्री व्याख्यानमालेचे आयोजन संस्कृती मंगल कार्यालय, अहमदपूर येथे वेळ : सायं. ६.०० वाजता करण्यात आले आहे.

अहमदपूर येथील मराठा सेवा संघ व समविचारी संघटनाच्या वतीने गेल्या १७ वर्षापासून जिजाऊ सावित्री व्याख्यानमालेचे यशस्वी आयोजन करण्यात आले असून महाराष्ट्रातील ख्यातनाम व्याख्याते व्याख्यानासाठी निमंत्रीत करण्यात आले.

`या १८ व्या वर्षाच्या व्याख्यानमालेसाठी दि.२१ फेब्रुवारी रोजी विषयः मिडीया आमचा; आवाज कुणाचा ? वक्ते : शर्मिष्ठा भोसले ( पत्रकार-मुंबई ), दि. २२ फेब्रुवारी रोजी विषयः आयुष्यातील आनंदाच्या वाटा विनोदी वक्ते डॉ. संजय कळमकर (अहमदनगर ) व दि.२३ फेब्रुवारी रोजी विषय : स्वयंघोषीत देशभक्तांचे वास्तव वक्ते : चंद्रकांत झटाले (लेखक, पत्रकार व निर्भिड वक्ते, अकोला) आदी मान्यवर वरील विविध विषयावर तीन दिवस पुष्प गुंफणार आहेत.

तरी या व्याख्यानमालेचा शहरासह तालुक्यातील व्याख्यान प्रेमी सुजान नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# कबीरवाणी

**आछे / पाछे दिन पाछे गए हरी से किया न हेत ।**
**अब पछताए होत क्या, चिडिया चुग गई खेत ॥**

**भावार्थ:** वेळ कोणासाठीही थांबत नाही. म्हणून आलेला दिवस हा जाणार आहे, दिवसामागून दिवस जात राहतात. अगदी तसेच चांगले दिवस आले, सुख प्राप्ती झाली की, आपण ईश्वराला विसरून जातो. जीवनामध्ये दुःख आले की ईश्वराची आठवण येते. त्यावेळी ईश्वराचे नाम स्मरण करत असतो. आणि तेंव्हा ईश्वराचा विसर पडला आहे अशी जाणीव होते. त्यावेळी पश्चात्ताप करून काही उपयोग होत नसतो. याची तुलना संत कबीरांनी शेतकऱ्या सोबत केली आहे. शेतकऱ्यांचे अगदी असेच आहे, शेतकऱ्याने आपल्या शेताकडे दुर्लक्ष केले की, पक्षी पीकं खाऊन टाकतात. म्हणजे शेतकऱ्यांना चांगल्या दिवसामध्ये शेतीचा विसर पडला की नुकसान होते. अगदी तशीच अवस्था सुखातील माणसाची आहे.

**डॉ.बालाजी गोविंद कारामुंगीकर**
**मो. ९८२३११२९०७**

# लातुरात विविध संस्था, पक्ष-संघटनांकडून शिवरायांना अभिवादन











लातूर / प्रतिनिधी- शिवजयंतीनिमित्त शहरासह जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालये, पक्ष व संघटनांच्यावतीनेही शिवरायांना विविध उपक्रम राबवून अभिवादन करण्यात आले.

**राष्ट्रवादी काँग्रेस**

लातूर : महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षण संघाच्यावतीने रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष मदन धुमाळ, जिल्हा सचिव दयानंद कांबळे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष राम व्यंजने, प्रा. अंकुश नाडे, गंगाधर आररडले, जिल्हा कार्याध्यक्ष शिवहर रोडगे, शहराध्यक्ष नागेश स्वामी, अशोक मोठे, तालुकाध्यक्ष आयुब पठाण, युवराज शिंदे, राजीव व्यंजने, संतोष देवणे आदी उपस्थित होते.

**महात्मा बसवेश्वर महाविद्यालय**

**लतूर, दि.१९-**

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे संचालक अ‍ॅड. श्रीकांत उटगे व अशोक उपासे यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय गवई होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. धोंडीबा भुरे, डॉ. टी. घनश्याम, विनायक लोमटे व यशपाल ढोरमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांनी शिवरायांच्या जीवन - कार्यावर प्रकाश टाकला. यशस्वीतेसाठी संजय गिरी, योगीराज माकणे, शुभम बिराजदार, अशोक शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

**छत्रपती शिवाजी विद्यालय**

तालुक्यातील मळवटी येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९४ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला मुख्याध्यापक युवराज शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक शिंदे यांनी विद्यार्थ्यांना शिवरायांच्या पराक्रमाची माहिती सांगितली. यावेळी सुहास माकणीकर, जाकरअली सय्यद, वैभवी पवार, विलास गिरी, मंजुषा शिंदे, चंद्रकांत चोपले, मधुकर गरड, बिटाजी भोसले, सुनील आगलावे व विद्यार्थी उपस्थित होते.

**शारदा इंटरनॅशनल स्कूल**

येथील शारदा इंटरनॅशनल स्कूलमध्ये हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज जयंती अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली.

रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील व उपाध्यक्ष एल. एम. पाटील यांच्या संकल्पनेतून शाळेत विविध स्तुत्य उपक्रम राबविण्यात येतात. शिवजयंतीनिमित्त शारदा स्कूलच्या पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी विविध किल्ल्यांच्या प्रतिकृती व शिवरायांच्या प्रतिमाद्वारे शाळेत शिवसृष्टी उभी केली. यात पालकांनी सहभाग नोंदवत चिमुकल्यांच्या शिवसृष्टी निर्मितीत योगदान दिले.

यावेळी शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना शिवरायांच्या पराक्रमाची माहिती सांगितली. शाळेचे प्राचार्य दत्ता घारगे यांनी विद्यार्थ्यांनी बनविलेल्या किल्ल्यांच्या प्रतिकृतीस भेट देऊन कौतुक केले. प्राचार्य घारगे यांनी शिवप्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. यावेळी विद्यार्थ्यांनी 'जय जिजाऊ - जय शिवराय' या घोषणांची गर्जना केली. पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख समन्वयक विद्या पाल यांच्या पुढाकारातून हा उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य विलास गायकवाड, उपप्राचार्या शिला शेळके, मुख्य समन्वयक वैशाली गिरवलकर, अन्य शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**कॉक्सिट महाविद्यालयात आरोग्य शिबिर**

**लतूर, दि.१८-**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त कॉक्सिट महाविद्यालयात आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी १२७ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले तर २०० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

कॉक्सिट महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने हा उपक्रम राबविण्यात आला. माऊली ब्लड बँकेच्यावतीने सहकार्याने हे शिबिर पार पडले. रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ.एम. आर. पाटील, प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे यांनी रक्तदात्यांचे कौतुक केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. डी. आर. सोमवंशी, डॉ. व्ही. व्ही. भोसले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी ईश्वर पाटील, आनंद वाघमारे, रुचिता पिनाटे, शरद गंगावणे आदी उपस्थित होते.

**राजमाता जिजामाता संकुल**

**लतूर / प्रतिनिधी-** येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय, संगमेश्वर विद्यालय व राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेज येथे 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानांतर्गत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९४ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना मानाचा मुजरा करण्यात आला.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्रा. अश्विनी केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, प्राचार्य गणपत मुंडे, प्रा. आर. व्ही. जायेभाये, राजीव मुंढे, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते आदी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी शिवरायांच्या शौर्याची गाथा आणि त्यांचे योगदान याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. सूत्रसंचालन ए. बी. मुंडे यांनी केले तर आभार राजीव मुंढे यांनी मानले. यावेळी संकुलातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**आलमला फार्मसीमध्ये शिवाजी महाराजांच्या भव्य प्रतिमेचे अनावरण**

औसा (प्रतिनिधी) छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेल्या शिकवणीच्या वाटेवर चालताना त्यांच्यामधील धैर्य आणि शौर्य, त्यांचा दूरदर्शीपणा, त्यांचे धोरणात्मक विचार करण्याची पद्धत, त्यांनी जपलेली नैतिकता आणि रयतेसाठी उपयोगात आणलेले प्रशासकीय कौशल्य हे त्यांच्या अंगी असलेले प्रमुख पाच गुण त्यांचा शौर्यप्रताप अधोरेखित करतात. आजच्या तरुणाईने त्यांचे हे गुण अंगीकारून कृतीत आणल्यास नक्कीच जीवनात यशस्वी होतील. छत्रपतींचा जयघोष करत असताना त्यांच्या विचारानुसार कृतिशील पाऊल टाकल्यास वाटचाल नक्कीच सुखकारक होईल छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र हे अवघ्या महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी असल्याचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे यांनी व्यक्त केले.

भव्य अशा छत्रपती शिवाजी महाराजांच्या नविन प्रतिमेचे पुजन करुन, अनावरण महाविद्यालयाच्या प्रांगणात प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, प्रशाकीय अधिकारी योगेश धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास प्रा.दिनेश गुजराथी, विभाग प्रमुख डॉ. समीर शफी, प्रा. डॉ. सुरज मालपानी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सचिन हंगरगेकर, डॉ. अजय फुगटे, युवराज काटु, डॉ. मोहम्मद रईस, कापसे विद्या, विकास मुगळे, किरण रोडगे, भागवत सोमवंशी, वागदरे एस.एस., गोसावी गणेश,सिरगिरे कविता, सुरेखा भोसले, मयुरी सुर्यवंशी, प्रगती कांबळे, बळीराम लवटे, गिरीशंकर भावले इत्यादी उपस्थित होते.

आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी व दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजमध्ये विध्यार्थ्यांनी मोठया उत्साहात पालखीची मिरवनुक काढुन शिवघोषणा देत शिवजयंती साजरी करण्यात आली,यावेळी विद्यार्थ्यांनी शिवरायांची गौरवगाथा सांगणारे ऐतेहासिक छायाचित्रांची प्रदर्शनी मांडून रायगड किल्ल्याची उभारणी केली या शिवसंग्रहालयचे उदघाट्न योगेश धाराशिव यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच शिवपाळणा, महाराजांच्या जीवनांवर आधारीत प्रश्न उत्तर स्पर्धा आयोजित करण्यात आली आणि यामध्ये विजेत्यास महाविद्यालयाच्या वतीने सन्मानित करण्यात आले. शिवजयंती जन्मोत्सव कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. सुरज मालपानी यांनी केले. शिवजयंती जन्मोत्सवास महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# जि.प.के.प्रा शाळा सांगवी (सु.) शाळेत हळदीकुंकु व महिला मेळावा



अहमदपूर ( प्रतिनीधी ) जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सांगवी सु. ता. अहमदपुर येथे रथसप्तमी निमीत्त हळदी कुंकवाचा कार्यक्रम अतिशय चांगल्या प्रकारे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक शिंदे बी.एन. शाळेतील जेष्ठ शिक्षिका श्रीमती तिगोटे के. जे.व प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती सोरगेकर आर.एम. श्री सतिष हलगरे सर व कांबळे फुलाबाई हे होते तसेच गावातील सर्व महिलांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे फलक लेखन श्रीमती कांबळे सावित्री तात्याराव यांनी अतिशय सुंदर केले हळदी कुंकवाच्या निमित्ताने शाळेत आज सांस्कृतिक कार्यक्रमाचे ही नियोजन करण्यात आले होते.

नियोजना प्रमाणे आज सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला व हळदी कुंकवाचा कार्यक्रम ही अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.
महिला मेळाव्यानिमित्त जमलेल्या महिलांना श्रीमती कांबळे सावित्री तात्याराव यांनी सविस्तर मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती मुंढे एम.व्ही यांनी केले.व कार्यकमासाठी उपस्थीत राहीलेल्या मान्यवरांचे आभार श्रीमती गोमारे शोभा यांनी मानले*
कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.
कार्यक्रमासाठी गावातील महिला भगीनी व शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# तरुण पिढीने छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा: सागर

लातूर / प्रतिनिधी: छत्रपती शिवाजी महाराज हे कुशल प्रशासक, युद्धनीती, राजनीती निपुण असे आदर्श लोककल्याणकारी राजे होते. आजच्या तरुणांनी छत्रपती शिवाजी महारज यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्य करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी केले. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीनिमित्त प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. कार्यक्राची सुरुवात महाराष्ट्र राज्य गीताने झाली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन दाताळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत दत्तात्रय गिरी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला बालकल्याण जावेद शेख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हणमंत वडगावे, कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोष नाईकवाडे, उप शिक्षण अधिकारी श्री. पवार, प्रशासन अधिकारी श्री. बादणे, रामकिशन फड, संतोष माने यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी शाहिर धम्मपाल सांवत व संच यांनी पोवाडा आणि शिवगीते सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संवादतज्ज्ञ उध्दव फड यांनी केले.

# आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या शेकडो जणांवर गुन्हे दाखल

धाराशिव (प्रतिनिधी) - मराठा आरक्षणासाठी धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बैलगाडी व ट्रॅक्टर आडवे लावून रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या तसेच जिल्ह्यात विविध ठिकाणी रस्ता रोको करणाऱ्या तसेच जमाव बंदीचे उल्लंघन करणाऱ्या शेकडो आंदोलकावर संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मराठा समाजास सगेसोयरे या सर्वांना सरसगट आरक्षण मिळावे या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या बाजीराव बप्पा सुर्यवंशी, रा. सांजा, ओम भुजंग सुर्यवंशी, संतोष सुर्यवंशी, अभिजीत काका सुर्यवंशी, सतिश मोहिते, संताजी सुर्यवंशी, बालाजी बप्पा सुर्यवंशी, विशाल मोन्या सुर्यवंशी, सतिश बप्पा सुर्यवंशी, सोहम सुर्यवंशी, काका पाटील, बाळू कदम, सुनिल नाना सुर्यवंशी, नंदु पाटील, प्रशांत सुर्यवंशी, प्रविण कदम, बालाजी सुर्यवंशी, अक्षय पौळे, ज्ञानेश्र्वर चंद्रकांत सावंत,धर्मराज आण्णासाहेब सुर्यवंशी, सागर शेळके, अजय सुर्यवंशी, नागेश शिंदे, जिवन जाधव सर्व रा. सांजा, बलराज श्रीमंतराव रणदिवे, रा. म.गांधीनगर, सत्यजित पडवळ, रा. शाहुनगर, निखील जगताप रा. इंगळे गल्ली, मनोज जाधव, रा. मेडसिंगा, अमोल जाधव रा. कारी, अक्षय अंकुश नाईकवाडी, रा कौडगाव, धैर्यशिल बाळासाहेब सस्ते, रा. धाराशिव, हनुमंत यादव, रा. गणेश नगर, अविनाश खानापुरे रा. तांबरी विभाग, व्यंकटेश पडिले रा. बालाजीनगर व इतर ३० ते ४९ जणांनी दि. १५ फेब्रुवारी रोजी ११ वा. सु. छत्रपती शिवाजी महाराज चौक धाराशिव येथे मराठा समाजाच्या आरक्षाणासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे येणारे जाणारे रोडवर बैलगाडी व ट्रॅक्टर उभे करुन तसेच बैलांना डांबरी रस्त्यावर तिन दिवस उन्हात बांधून त्यांना वेदना होतील असा छळ करुन क्रुरतेने वागणुक देवून बैलगाड्या आडव्या लावून येणारे जाणारे वाहनाना अटकाव करुन मानवाच्या जिवीतास धोका निर्माध होईल अशा स्थितीत बैल रिकामे सोडून सर्व रोड बंद करुन चक्का जाम आंदोलन सुरुच ठेवून मा. जिल्हा अधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी धाराशिव यांचे जमावबंदी व शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-हनुमंत जालींदर म्हेत्रे, वय ३६ पोलीस नाईक १४७४ नेमणुक पोलीस ठाणे आनंदनगर यांनी दि.१८ फेब्रुवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो. ठाणे येथे कलम ३४१, २८३,१८८ भा.दं.वि.सं. सह म.पो.का.११९, १३५ सह कलम ११ (१)(क) प्राण्यांना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६० अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तसेच आनंद नगर पोलीस ठाण्यात निखील राजाभाऊ गाढवे, निखील चंद्रकांत गाढवे, स्वप्निल संभाजी गाढवे, विकास गोरोबा पवार, बजरंग गौतम गाढवे, दादा गाढवे, वंदु मसे, सागर बाकले, वैभ्व बाकले, सर्व रा. वरुडा ता. जि. धाराशिव यांनी दि. १५ फेब्रुवारी रोजी ३.३० ते ६ वा. सु. वरुडा गावातील चौकात तेर ते धाराशिव रोडवर, धाराशिव ते औसा जाणारे रोडवर, असे वेगवेगळ्या तीन ठिकाणी मा. जिल्हा अधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी धाराशिव यांचे जमावबंदी व शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन करुन बेकायदेशीर रित्या जमाव जमवून येणारे जाणारे वाहनास अडवून रहदारीस अडथळा निर्माण करुन विनापरवानगी रास्ता रोको आंदोलन केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दिनेश चिलवंत, पोलीस नाईक ४२३, श्रीशेल कट्टे, सपोफौ लियाकत पठाण पोलीस हावलदार धाराशिव ग्रामीण यांनी दिलेल्या तक्रारीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम ३४१, १८८ भा.दं.वि.सं. स्वतंत्र ३ अन्वये गुन्हा नोंदवला आहेत.

जमावबंदी व शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन व शासकीय कामात अडथळा करणाऱ्यांवर गुन्हे दाखल.

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे :आरोपी नामे-१) प्रविण देशमुख, २) तुकाराम पवार, ३) संजय लोखंडे, ४) श्रीमंत नवले, ५) धैर्यशील सस्ते, ६) विकास नलावडे, ७) प्रसाद पवार, ८) विनोद भिमराव पवार, ९) हनुमंत शेळके, १०) अमोल पवार, ११) राम शिवाजी सस्ते, १२) दत्ता बाबासाहेब काटे, १३) सागर सस्ते, १४) सागर कच्रे, १५) रोहीत बाबासाहेब काटे, १६) अमीत रणखांब, १७) शरद सावंत, १८) संतोष पवार, १९) बाजीराव देशमुख, २०) संतोष दुमणे, २१) दिपक पवार, २२) सुरज पवार, २३) बाबा देशमुख, २४) दत्ता तुपे, २५) नवले सर ,२६) किशोर पवार, २७)देशमुख सर, २८) महेश पवार, २९) अक्षय जोरे, ३०) गणेश वीर, ३१) नितीन शिंदे, ३२) मामा इंगळे, ३३) खडके टपरी, ३४) चंदन नलावडे, ३५) विकास नलावडे, व इतर ९० ते १०० इसमांनी दि. १८.०२.२०२४ रोजी १०.३० ते १२.३० वा. सु. येडशी येथे सोनेगाव चौकामध्ये एनएच ५२ हायवे रोडवर मा. जिल्हा अधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी धाराशिव यांचे जमावबंदी व शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन करुन बेकायदेशीर रित्या जमाव जमवून राष्ट्रीय महामार्गावर येणारे जाणारे वाहनास अडवून रहदारीस अडथळा निर्माण करुन विनापरवानगी रास्ता रोको आंदोलन करुन फिर्यादी व स्टाफ वाहतुक सुरळीत करत असताना शासकीय कामात अडथळा निर्माण केला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अविनाश दिगंबर शिंदे, पोलीस हावलदार /११२२ नेमणुक पोलीस ठाणे धाराशिव ग्रामीण यांनी दिलेल्या तक्रारीवरून ३४१, १८८, १४१, १४३, १४७, १४९, ३५३ भा.दं. वि.सं. सह मपोका कलम १३५, ३७ (१) सह राष्ट्रीय महामार्ग कायदा कलम ८ (अ) (१) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय–गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी–२४६९४६, मुख्य कार्यालय –५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी–२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, धाराशिव कार्यालय दूरध्वनी–(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय – दूरध्वनी – २२१४५३, उदगीर कार्यालय–(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ९८०२२८२४०(अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही) संस्थापक संपादक–**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक – **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

यशवंत धाराशिव जिल्हा
बुधवार दि. २१ फेब्रुवारी २०२४
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com



## भारतीय जनता पक्षाच्यावतीने शिवजयंती साजरी

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती भारतीय जनता पार्टीच्यावतीने दि.१९ फेब्रुवारी रोजी साजरी करण्यात आली.

धाराशिव शहरातील प्रतिष्ठाण भवनमध्ये भारतीय जनता पार्टीचे लोकसभा निवडणूक प्रमुख नितीन काळे, शहराध्यक्ष अभय इंगळे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर, भागोदय सुतार, आश्रम शिंदे, योगेश मुळे, विनोद कोकाटे, शिवशंकर सगर आदी उपस्थित होते.




# जिल्हाभरात विविध उपक्रमांनी शिवजयंती उत्साहात साजरी

## महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी

## जय भवानी, जय शिवाजी घोषणांनी जिल्हा दुमदुमला

## मोटारसायकल रॅलीमध्ये जरांगे यांच्या मुला-मुलीचा सहभाग

## संपूर्ण शहरासह जिल्हा झाला भगवे व शिवमय



**धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) - हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, बारा बलुतेदार व आलूतेदारांना सोबत घेऊन रयतेचे स्वराज्य निर्माण करणाऱ्या श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९४ व्या जयंतीनिमित्त धाराशिव शहरासह जिल्ह्यामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासह शिवरॅली, मोटारसायकल रॅली, शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित नाट्य प्रयोग, दांडपट्ट्याचा खेळ, वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा आधी विविध उपक्रम राबविण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास दुग्धाभिषेक हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. जय भवानी, जय शिवाजी... तुमचे आमचे नाते काय, जय भवानी जय शिवराय.... जय जिजाऊ जय शिवराय.... राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज, बुद्धभूषण छत्रपती संभाजी महाराज यांचा विजय असो.... अशा विविध गगनभेदी घोषणा व मिरवणूक व रॅलीने संपूर्ण जिल्हाभरातील वातावरण शिवमय व भगवे मय झाले होते.**



### जिल्हाधिकारी डॉ ओंबासे यांच्या हस्ते दुग्धाभिषेक

धाराशिव – धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्रूट पुतळ्यास जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे यांच्या हस्ते सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी वसुधा फड आदीसह शिव जन्मोत्सव सोहळा समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी व शिवप्रेमी उपस्थित होते. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक नंतर पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यानंतर मोठा जल्लोष करण्यात आला.



### पालकमंत्री प्रा डॉ सावंत यांच्यावतीने केली पुष्पवृष्टी !

छत्रपती शिवाजी महाराजांच्या धाराशिव व तुळजापूर येथील अश्वारूढ पुतळ्यावर राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत यांच्यावतीने जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांनी फुलांची अर्धा तास हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. हेलिकॉप्टर पुष्पवृष्टी करण्यास आले असता उपस्थित शिवप्रेमींनी प्रचंड घोषणाबाजी करीत जल्लोष व आनंद व्यक्त करण्यात आला. यावेळी घोषणा, टाळ्यांचा कडकडात व गगनभेदी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. तसेच प्रत्येकांनी नाचत आपला आनंद व्यक्त केला.



### राष्ट्रवादीच्या शिव सप्ताहाचे प्रदेश चिटणीस पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) च्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या शिव सप्ताहाचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सुरेश पाटील यांच्या हस्ते शिवजयंती दिनी दि.१९ फेब्रुवारी रोजी करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने राज्यभरामध्ये शिव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश चिटणीस सुरेश पाटील यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे धाराशिव – कळंब विधानसभा अध्यक्ष मोहन मुंडे, धाराशिव शहराध्यक्ष सचिन तावडे, युवा जिल्हा कार्याध्यक्ष मनोज जगताप, सिने अभिनेता सचिन गवळी, धाराशिव शहर उपाध्यक्ष सतीश बारकुल, बापू करंजकर, सचिन करवर, पप्पू गरड, दत्ता जाधव, बालाजी जाधव, बालाजी सुरवसे, विक्की मुंडे, गणेश शेळके आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रतिमा सजविलेल्या ट्रॅक्टरमध्ये बसविण्यात आली होती. तर रॅलीमध्ये बाल शिवाजी हे मुख्य आकर्षण होते. तर वारकऱ्यांची यांची दिंडी व बँड पथक सहभागी झाले होते. राजमाता जिजाऊ चौक, लेडीज क्लब चौक, राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाजत गाजत व फटाक्यांची आतषबाजी करीत काढण्यात आली. ही रॅली संत गाडगेबाबा महाराज डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या रॅलीमध्ये नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## ३८४ रक्तदात्यांचे रक्तदानाने अभिवादन

छत्रपती शिवाजी महाराज चौकात धाराशिव शहरातील साई सामाजिक स्वयंसेवी संस्थेच्यावतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. धाराशिव शहरातील रेणुका ब्लड बँक व सोलापूर येथील हेगडेवार ब्लड बँक यांच्या माध्यमातून रक्त संकलन करण्यात आले. याचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष रोहित निंबाळकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी ३९४ व्या जयंतीनिमित्त ३९४ महिला व पुरुषांनी रक्तदान करून शिवरायांना अभिवादन केले.




धाराशिव – शिवजयंतीनिमित्त शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्यावतीने काढण्यात आलेल्या भव्य शिवमोटारसायकल रॅलीमध्ये मनोज जरांगे यांची मुलगी व मुलगा हे दोघेजण दि.१९ फेब्रुवारी रोजी सहभागी झाले होते.

धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास मनोज जरांगे यांची मुलगी पल्लवी व मुलगा शिवराज यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर समितीच्या रॅलीच्या वाहनावर पल्लवी व शिवराज जरांगे या दोन्ही भावंडांनी या रॅलीचे नेतृत्व केले. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून रॅलीचा प्रारंभ करण्यात आला. शहरांमध्ये ठिकठिकाणी सर्व जातीय सर्वधर्मीय लोकांनी जरांगे कुटुंबियांचे भव्य स्वागत केले. प्रत्येक चौका चौकात साजरा होणाऱ्या शिवजयंती महोत्सवास भेट देऊन आदर सत्कार करून उत्साहवर्धक वातावरणात मार्गस्थ झाली. ही रॅली देशपांडे स्टँड, नेहरू चौक, काळा मारुती चौक, आर्य समाज, जिजाऊ चौक, सेंट्रल बिल्डिंग मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात या रॅलीचे विसर्जन करण्यात आले. जय भवानी, जय शिवाजी, तुमचं आमचं नातं काय, जय जिजाऊ जय शिवराय या जयघोषणा संपूर्ण शहर दणाणून सोडले. रॅलीमध्ये सहभागी असलेल्या प्रत्येक वाहनास भगवे ध्वज मोठ्या प्रमाणात लावल्याने ते फडकत होते. ठिकठिकाणी जल्लोष व जयघोष तसेच फटाक्यांची आतषबाजी यामुळे संपूर्ण शहर शिवाजी महाराजांच्या शिवमय झाले होते. या रॅलीच्या यशस्वितेसाठी समितीचे धर्मराज सुर्यवंशी, शशिकांत खुणे, जयराज खोचरे, संजय शिंदे, संतोष घोरपडे, गौरव बागल, आकाश कोकाटे, शुभम लोकरे, अमोल पवार, अच्युत थोरात, दत्ता साळुंखे, आकाश भोसले, भैरवनाथ रणखांब, मंगेश निंबाळकर, हनुमंत यादव यांच्यासह मावळ्यांनी प्रयत्न केले. या रॅलीमध्ये हजारो मावळे उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.





### पुतळ्यासमोरच आरक्षणासाठी आंदोलन

